दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३३ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.२० ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

### पाच दिवसीय माता महाकाली महोत्सवाचा शुभारंभ

## विकासाच्या बाबतीत जिल्ह्याला प्रथम प्राधान्य-विधानसभा अध्यक्ष ॲड.नार्वेकर







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्याने महाराष्ट्राला वेगळी ओळख दिली आहे. सर्वात जास्त उद्योगधंदे या जिल्ह्यात असून ऐतिहासिक वारसा देखील लाभला आहे. हा जिल्हा बहुतांश ग्रामीण आणि राज्याच्या कोपऱ्यात असला तरी या जिल्ह्याला विकासाच्या बाबतीत प्रथम प्राधान्य देण्यात येईल, अशी ग्वाही महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी दिली. श्री. माता महाकाली महोत्सव ट्रस्ट, चंद्रपूरच्यावतीने पाच दिवसीय माता महाकाली महोत्सवाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी, माता महाकाली महोत्सव समितीचे संयोजक तथा आमदार किशोर जोरगेवार, आमदार सुभाष धोटे, आमदार प्रतिभा धानोरकर, सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सुधा पोटदूखे, आशा महाकाले, डॉ. किर्तीवर्धन दीक्षित, मधुसुदन रुगंठा, ड. विजय मोगरे, नंदु खनके, अजय जयस्वाल, बलराम डोडाणी यांच्यासह माता महाकाली महोत्सव समितीचे सदस्य तसेच सराफा असोसिएशनच्या सदस्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. महाकाली मातेचे दर्शन घेण्याची संधी आणि चंद्रपूरकरांचे आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी आज येथे आलो असल्याचे सांगून ड. राहुल नार्वेकर म्हणाले, या नवरात्रोत्सवात अनेक ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. मात्र, आजच्या कार्यक्रमाची ख्याती काही वेगळीच आहे. विमानतळापासून तर मंदिरापर्यंत चंद्रपूर शहराला सजविण्यात आले आहे. चंद्रपूरवासियांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. त्यांच्याकडे बघितल्यावर असा भाव दिसून येतो जणू आजच दिवाळी आहे. ही प्रथा व परंपरा कायम ठेवून हा उत्साह चंद्रपूरवासियांमध्ये कायम ठेवण्याचे आवाहन त्यांनी आयोजकांना केले. तसेच देखण्या व प्रभावशाली कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.ते पुढे म्हणाले, या देवस्थानाची एक वेगळी ओळख आहे. भारतात अनेक जुन्या वास्तू आहेत, त्यासर्व वास्तूंमध्ये ही प्राचीन वास्तू पहावयास मिळते. प्राचीन काळापासून अस्तित्वात असणाऱ्या या मंदिराचा गाभारा आणि गाभाऱ्याचा बाहेरचा मंदिराचा परिसर निर्माण केला गेला आहे. या सर्व वास्तूंनी छत्रपती शिवाजी महाराजांपासून तर त्याहून प्राचीन काळापासूनचा इतिहास अनुभवला आहे. त्यामुळे अशा वास्तूचे जतन करण्याचे कार्य चंद्रपूरकरासह येथील ट्रस्ट तसेच लोकप्रतिनिधींनी केले आहे. त्यांचे कौतुक केले तेवढे कमीच आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले. देशाला संस्कृतीची राजधानी म्हणून ओळखले जाते. अशा प्राचीन संस्कृतीचे जतन केल्यामुळे भारत देशाला वेगळी ओळख संपूर्ण जगात प्राप्त झाली आहे. आज हा देश संस्कृतीचा आधार घेत जगात अत्यंत प्रगतशीलपणे पुढे जात आहे. भारत देश जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून पुढे आली आहे. एवढेच नव्हे तर चंद्रापर्यंत झेप घेत अत्यंत यशस्वी मिशन देशाने राबवून या जगात आपली नवी ओळख निर्माण केली आहे, याचा अभिमान असल्याचे ते म्हणाले. त्यासोबतच या जिल्ह्यात दीक्षाभूमी आहे. शासनाला या दीक्षाभूमीचा विकास करणे क्रमप्राप्त आहे. येणाऱ्या अधिवेशनात याकरीता वैयक्तिकरीत्या पाठपुरावा करून जिल्ह्याला अपेक्षित असणारे कार्य लवकरात लवकर करून दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. प्रास्ताविकेत बोलतांना आमदार जोरगेवार म्हणाले, मागील वर्षीपासून या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. जिल्ह्याला ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. चंद्रपूर हा महाराष्ट्राला ऊर्जा देणारा जिल्हा आहे. महाराष्ट्रातून ३० टक्के ऊर्जानिर्मिती या जिल्ह्यातून केली जाते. या जिल्ह्यात राहणारे नागरिक सुद्धा ऊर्जावान आहे. स्व. बाबा आमटे यांचे आनंदवन या जिल्ह्यात असून सेवा करणारा हा जिल्हा आहे. तसेच जगातील सर्वाधिक वाघ या जिल्ह्यात असून वाघासारखाच शक्तिमान हा जिल्हा आहे. त्यासोबतच ११ किलोमीटरचा परकोट या जिल्ह्याला लाभला असून भारतात अशी ठिकाणे फार कमीच असतील असेही ते म्हणाले.

**नवरात्रात जन्मलेल्या नवकन्यांच्या पालकांचा सत्कार**

**नवरात्रात कन्यारत्न प्राप्त झालेल्या पालकांचा सत्कार विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या हस्ते चांदीचा शिक्का देऊन करण्यात आला. त्यासोबतच पद्मश्री डॉ.परशुराम खुणे, फ्लोरेन्स नाईटिंगेल पुरस्कार प्राप्त परीचारिका पुष्पाताई पोडे, डॉ. रविकांत खोब्रागडे, शर्वरी गुंडावार यांना शॉल, श्रीफळ देऊन यथोचित सत्कार ॲड. राहुल नार्वेकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन अलका ठाकरे तर आभार मिलींद गंपावार यांनी मानले**

**चित्रकला प्रदर्शनीचे उद्घाटन तथा पाहणी**

महाकाली मंदीर परीसरात विविध शालेय विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रकला प्रदर्शनीचे उदघाटन महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी सदर चित्रकला प्रदर्शनीची पाहणी केली.

**माता महाकालीच्या चांदीच्या मूर्तीची विधीवत प्रतिष्ठापना:**

श्री माता महाकाली महोत्सवाच्या उदघाटन समारंभ कार्यक्रमाप्रसंगी महाकाली मातेची पालखी काढण्यात आली. या पालखीतून ८ किलो चादींच्या मुर्तीची विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर आणि आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते विधिवत पुजा करुन प्रतिष्ठापना करण्यात आली.

## आनंद निकेतन महाविद्यालयामध्ये आंतर महाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धेचे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**




दिवसेंदिवस क्रीडा विश्वात आपले नाव प्रगतीपथावर घेऊन चाललेल्या आणि नेहमी विविध क्रीडाप्रकारासाठी चर्चेत असलेल्या वरोरा येथील आनंद निकेतन महाविद्यालयामध्ये गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या वतीने आंतर महाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेचे आयोजन हे १७ऑक्टोबर २०२३ ला महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन सकाळी १० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे, शारिरीक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख प्रा.तानाजी बायस्कर, स्पर्धेचे प्रमुख पंच प्रज्वल निंघोट यांच्या हस्ते करण्यात आले. ही संपूर्ण स्पर्धा मुले आणि मुली अश्या दोन गटांमध्ये खेळवण्यात आली होती. त्यामध्ये विद्यापीठातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील मुलांच्या १० आणि मुलींच्या ८ अश्या ऐकून १८ संघांनी आपला सहभाग नोंदविला. सांघिक विजेतेपदामद्ये आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत मुलांमध्ये आनंद निकेतन महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला, लोकमान्य विद्यालयाने द्वितिय क्रमांक पटकावला तसेच शरद पवार कला व वाणिज्य महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे मुलींमध्ये आनंद निकेतन महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला, गुरूकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाद्यिालयाने द्वितीय क्रमांक पटकावला तर लोकमान्य विद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला.तसेच वयक्तिक पुरलेला मल्लखांब मध्ये हर्षल धांडे आणि कुणाल दातारकर (आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा)प्रथम आणि द्वितीय तर अक्षय निखाते (गोंडवाना कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जिवती) तृतीय क्रमांक पटकावला. मुलींमध्ये वयक्तिक रोप मल्लखांब मध्ये ज्योती झाडे आणि आचल गजभे (आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा) प्रथम आणि द्वितीय तर अनुराधा वांधरे (सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर) तृतीय क्रमांक पटकावला.तसेच या स्पर्धेमधून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेकरिता संघ निवडण्यात आला.या स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.उत्तम देऊळकर शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख लोकमान्य महाविद्यालय वरोरा,डॉ.पैनकर शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख गुरुकुल महाविद्यालय,गडचांदूर आणि शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. तानाजी बायस्कर आदी पाहुणे उपस्थिती होते. या संपुर्ण पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या संघाला चषक देऊन गौरविण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेचे आयोजन आनंद निकेतन महाविद्यालयाने यशस्वीरित्या केले.

## उर्जावान वाणीतून वंदे मातरम म्हणणाऱ्याच्या पाठीशी-ना.मुनगंटीवार

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाघनख घरवापसीसाठी युवाशक्तीचा जल्लोष

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



छत्रपती शिवाजी महाराजांचे हे हिंदवी स्वराज्य आहे.यासाठी वीर सावरकर म्हणतात,देहा पासून देवाकडे जातांना मधात देश लागतो.आपापल्या परीने देशासाठी योगदान द्या.उत्तम गुण घेऊन आयुष्याची परीक्षा पास करा,आई वडिलांचा संकल्प पूर्ण करा.मी विश्वास देतो,सळसळत्या रक्ताच्या,धडकत्या हृदयाच्या उर्जावान वाणीतून वंदे मातरम म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी परिवाराचा सदस्य म्हणून सदैव उभा आहो.असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य,मत्स्यव्यवसाय व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

ते गिरनार चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे वाघनखे देशात परत आणण्याचा इंग्लड सोबत करार (एम ओ यू झाल्यावर चंद्रपूरात प्रथम आगमन प्रसंगी गिरनार चौक येथे युवाशक्ती तर्फे आयोजित जल्लोष कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष व सत्कार मूर्ती म्हणून बोलत होते.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भाजपा जिल्हाध्यक्ष (ग्रा)हरीश शर्मा,जिल्हाध्यक्ष(श)राहुल पावडे भाजपा नेते रामपालसिंह,तुषार सोम,सुदर्शन बुटले,किरण बुटले,सविता कांबळे,रवी लोणकर,धनराज कोवे,धम्मप्रकाश भस्मे,सोहम बुटले,सुरज पेदुलवार सत्यम ,भाग्यश्री भूमकर,विश्वदीप इंगळे,अनिकेत मगरे,विश्वजित पांडा,अमन गलोकर यांची उपस्थिती होती.यावेळी विविध भेट वस्तू देऊन सोहम बुटले यांनी विद्यार्थ्यांच्या वतीने ना.मुनगंटीवार यांचा सत्कार केला.ना.मुनगंटीवार म्हणाले,सन २०४७ ला जेव्हा भारताच्या शताब्दी स्वातंत्र्याचा झेंडा आकाशात फडकेल तेव्हा,जगातील १९३ देशातल्या नागरिकांनी माझ्या भारतीय राष्ट्रध्वजाला सॅल्युट करत,भारत माता की जय म्हंटले पाहिजे,इतका गौरवशाली भारत निर्माण करण्याचा संकल्प विश्वनायक पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आहे.यासाठी युवापिढीने आत्मनिर्भर झाले पाहिजे.आपल्याला जगाचा कप्तान व्हायचं असेल तर,यासाठी एकच विचाराचा महामार्ग आहे,तो महामार्ग छत्रपती शिवाजी महाराज आहेत.ज्यांच्या शब्दा शब्दातून आयुष्याचा एक मार्ग सापडतो.माझ्याकडे सांस्कृतिक मंत्रालय आल्यानंतर वाघनखे आणण्यासाठी प्रयत्न सुरू केला त्याला यश आले.१९५३ पासून मागणी असलेल्या अफजलखानच्या कबरीचं अतिक्रमण हटविण्याचे सौभाग्य मला मिळाले.हेच नाहीतर अयोद्धेतील राममंदिर व नवीन संसद भवनासाठी(सेंट्रल विस्टा)काष्ठ,दंडकारण्य समजल्या जाणाऱ्या चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील आहे,ही बाब चंद्रपूरसियांसाठी गौरवास्पद असल्याचे ना.मुनगंटीवार यांनी सांगितले.छत्रपतींची जगदंब तलवार भारतात आणण्यासाठी लढाई लढण्याची घोषणा त्यांनी केली.यावेळी रिशा गेडाम यांनी समयोचित मार्गदर्शन केले.प्रारंभी शिवरायांची आरती करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोहम बुटले यांनी तर संचालन यश तुटेकर यांनी केले.अनिकेत मगरे यांनी आभार मानले.

## 'सफाई कामगार ते सरपंच', 'मोऱ्या' उर्फ सीताराम जेधेचा थक्क करणारा प्रवास!

**मुंबई । प्रतिनिधी**

आपण वाट्टेल तिथे फेकलेला हजारो टन कचरा, टाकलेलं कुजलेलं अन्न, प्लास्टिक, बाटल्या, रत्यावर मारलेल्या पिचकाऱ्या, स्वयंपाकघर, प्रसाधनगृहातील सांडपाणी, फुटलेली-तुंबलेली गटारे, कुठल्याही साधनसामुग्रीशिवाय मॅनहोलखालील ड्रेनेज लाइन स्वच्छ करणाऱ्या देवदूतांपैकीच एक असणारा 'मोऱ्या' उर्फ सीताराम जेधे. 'सफाई कामगार' ते 'पिंपळनेरचा सरपंच' हा त्याचा थक्क करणारा जीवनप्रवास नेमका आहे तरी कसा हे दाखविण्यासाठी 'मोऱ्या' चित्रपट लवकरच सर्वांच्या भेटीस येत आहे.

'मोऱ्या'च्या कथेने युरोपमधील लंडन, मिल्टन केन्स, मेंचेस्टर, इटली इत्यादी शहरांसह अमेरिकेतील न्यूयॉर्क, रॅले, ऑक्सफर्ड (यूएसए) तसेच ऑस्ट्रेलिया, सिंगापूर अश्या देशांतील रसिकांना आकर्षित केले असून 'मोऱ्या' उर्फ सीताराम जेधेला भेटण्यासाठी ते विशेष उत्सुक आहेत. येत्या ५ नोव्हेंबरला मोऱ्या उर्फ सीताराम जेधेची भूमिका करणारा लेखक, दिग्दर्शक व अभिनेता जितेंद्र बर्डे लंडनला रवाना होणार आहे. वरील देशांतील प्रतिनिधींसाठी या चित्रपटाचं विशेष स्क्रीनिंग लंडनजवळच्या मिल्टन केन्स येथे आयोजित करण्यात आले आहे. या शो नंतर डिसेंबर २०२३ मध्ये जगभरातील अनेक शहरामध्ये हा चित्रपट प्रदर्शित केला जाणार आहे.'मोऱ्या'चा टीझर 'कान महोत्सवात दाखवण्यात आला होता. एलएचआयएफएफ बार्सिलोना आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, खजुराहो आंतरराष्ट्रीय सिनेमहोत्सव, झारखंड आंतरराष्ट्रीय सिनेमहोत्सव-२०२२, पेनझान्स आंतरराष्ट्रीय सिनेमहोत्सव,



अयोध्या फिल्म फेस्टिव्हल, लेक सिटी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल, बॉलिवूड इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल या चित्रपट महोत्सवांत या सिनेमाला 'उत्कृष्ट चित्रपटा'चा बहुमान मिळाला आहे. तसंच यापैकी काही महोत्सवांमध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट बालकलाकार, सर्वोत्कृष्ट कथा असे पुरस्कारही या सिनेमानं पटकावले आहेत. जितेंद्र बर्डेची ही पहिलीच कलाकृती आहे. या निर्मितीसाठी निर्माती तृप्ती कुलकर्णी, राजेश अहिवले, सहनिर्माते प्रेरणा धजेकर, पूनम नागपूरकर, मंदार मांडके, राहुल रोकडे, सचिन पाटील यांची खंबीर साथ लाभली आहे.'टॉर्टुगा मोशन पिक्चर्स' निर्मित 'मोऱ्या'मध्ये उमेश जगताप, संजय भदाणे, धनश्री पाटील, राहुल रोकडे, सुरज अहिवळे, रुद्रम बर्डे, कुणाल पुणेकर, शिवाजी गायकवाड, दीपक जाधव, विजय चौधरी, अविनाश पोळ, रुपाली गायके आणि जितेंद्र पुंडलिक बर्डे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटात उमेश जगताप, संजय भदाणे, धनश्री पाटील, रुद्रम बर्डे, कुणाल पुणेकर आणि शीर्षक भूमिकेत जितेंद्र बर्डे यांनी काम केले आहे. हा चित्रपट लवकरच महाराष्ट्रातही प्रदर्शित होणार आहे.

## माजी सैनिक, विधवांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती १५ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये माजी सैनिक,माजी सैनिक विधवा यांच्या पाल्यांना इयत्ता १०वी व १२वी मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत किमान ६० टक्के गुणांनी उत्तीर्ण झालेल्यांना पुढील शिक्षणासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून शिष्यवृत्ती देण्यात येते. यासाठी इच्छुक व पात्र असणाऱ्या माजी सैनिक, माजी सैनिक विधवा यांच्या पाल्यांनी दि. १५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.लाभार्थ्यांचा अर्ज, शिष्यवृत्ती फार्म, ओळखपत्राची छायांकित प्रत, बोनाफाईड प्रमाणपत्र, उत्तीर्ण गुणपत्रिकेची झेरॉक्स व इतर कुठल्याही योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती मिळत नसल्याचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत. ज्या माजी सैनिकांच्या पाल्यांना पंतप्रधान शिष्यवृत्ती अंतर्गत शिष्यवृत्ती मिळवायची आहे, अशा पाल्यांना जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाची शिष्यवृत्ती लागू होत नाही. तसेच ज्या पाल्यांनी सीईटी, जेईई किंवा इतर कारणासाठी गॅप घेऊन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी प्रकरणासोबत गॅप सर्टिफिकेट जोडावे.अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, रूम नं.३, चंद्रपूर येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

# एक राज्य, एक गणवेश

**गणवेश हा कुठलाही असो, तो समूह भावनेचे आणि शिस्तीचे प्रतीक आहे. विशेषत: शालेय जीवनात गणवेशाचे विशेष महत्त्व आहे. तो परस्परांतील भेदभाव मिटवून सर्वांमध्ये एकसमानता प्रस्थापित करतो. समूह शिक्षण घेताना भेदभावाची दरी कमी करण्यासाठी शालेय जीवनात गणवेशाचे अद्वितीय स्थान आहे.**




गणवेशाचे वैशिष्ट्ये हे आहे की, सर्व विद्यार्थ्यांमध्ये एकसमानता दिसून यावी. शाळेत येणारी मुले ही वेगवेगळ्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीतून अध्ययन करण्यासाठी येत असतात. काही गरीब,काही मध्यमवर्गीय तर काही श्रीमंत व सुखवस्तू कुटुंबातून येत असतात. अशावेळी जर शाळेत गणवेशाची अंमलबजावणी होत नसेल तर काही मुले रोज छानछान व नवनवीन फॅशन डिझायनिंगची कापड घालून शाळेत येतील. गरीब घरची मुले साधी कापड, तर श्रीमंत घरची महागडी कापड घालून शाळेत येऊ लागतील. त्यामुळे अनावधानाने का होईना विद्यार्थ्यांमध्ये कपड्यांवरून व त्यांच्या आर्थिक परिस्थितीवरून भेदभाव निर्माण होऊ शकतो. वर्गामध्येच गरीब आणि श्रीमंत मुले अशी विषमतेची दरी निर्माण होईल. परिणामतः विद्यार्थ्यांमध्ये निखळ मैत्री निर्माण होण्यात अडचणी जातील. म्हणून शालेय गणवेश हा विद्यार्थ्यांमध्ये एक समानता टिकवून ठेवण्यासाठी व कोणी श्रेष्ठ वा नीच नाही अशी समानतेची शिकवण देत असतो. शाळा हे विद्येचे मंदिर आहे.येथे सगळेच समान आहे हा मंत्र देत असतो. सर्वजण एकसमान आहेत हे दर्शविण्यासाठी शाळेमध्ये गणवेशाची संकल्पना पुढे आली असावी. गणवेश समानतेची शिकवण देतो व बरोबरीच्या इतर मित्रांबरोबर नेहमी समानतेने आणि प्रेमाने वागण्याचा प्रयत्नवाद शिकवतो. सर्व शिक्षण अभियान अंतर्गत शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थी तथा सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस प्रत्येकी दोन गणवेश मोफत मिळत. सदर गणवेश अनुदान शालेय खात्यावर प्रती विद्यार्थी ३०० रुपये देण्यात येईल असे ठरले. त्याआधी शालेय व्यवस्थापन समिती अंतर्गत सभेतील ठरावानुसार गणवेश कापड पुरवठादार व शिलाई टेलर यांची निवड करण्यात येऊन गणवेश वाटप केले जात. परंतु २०१७-१८ पासून सदर अनुदान थेट अनुदान हस्तांतरण योजनेतंर्गत प्रत्येक विद्यार्थ्याच्या आधार संलग्रित वैयक्तिक खात्यावर वर्ग करण्यात आले. वर्ग करण्यापूर्वी विद्यार्थ्यास त्याच्या पालकांनी गणवेश खरेदी करून दिला अथवा नाही याची याची खात्री पटण्यासाठी सदर गणवेशाची खरेदी पावती शालेय कार्यालयात जमा करण्यात करून तशी खात्री पटल्यावरच विद्यार्थ्याच्या



खात्यात पैसे जमा करण्यात येत होते. यावर काही लोकांनी गणवेश सक्तीचा करू नये. विद्यार्थ्यांना हवे तसे कपडे घालू द्यावे. या वयात ड्रेस कोड इत्यादी नियम नसावे असे सुचवत शासनाने केवळ शिकवण्यावर आणि शैक्षणिक दर्जा वाढीवर अधिक भर दिला पाहिजे असे सांगण्याचा प्रयत्न केला.परंतु आता राज्य सरकारने मागच्या बुधवारी निर्णय घेतला. महाराष्ट्र राज्यात एक राज्य एक गणवेश धोरणाची सरकारकडून अंमलबजावणी होणार असल्याचे निर्णय वाचण्यात आले आहे. या गणवेशासाठी लागणाऱ्या कापडांची केंद्रीय पद्धतीने खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. गणवेशासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महिला बचत गटामार्फत शिलाई करून त्यांचे विद्यार्थ्यांना वितरण केले जाणार आहे. त्यामुळे आता पुढील शैक्षणिक सत्रापासून विद्यार्थ्यांना लागणाऱ्या गणवेशाची शाळास्तरावर होणारी खरेदी बंद होणार आहे. केंद्र सरकारच्या समग्र शिक्षा अभियानाच्या माध्यमातून सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थिनी आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिला जाईल .यंदा राज्य सरकारने एक राज्य गणवेश या धोरणानुसार सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळातील पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना समान गणवेश देण्याचा निर्णय पुढील शैक्षणिक सत्रापासून घेतला. त्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुढील सत्रापासून प्रत्येक विद्यार्थ्याला एकसमान रंगाचे दोन गणवेश देण्याचा निर्णय घेतला गेला. त्यासाठी ई-निविदा राबवून गणवेशाचे कापड खरेदी करण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले असल्याची माहिती ऐकायला मिळाली. तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून स्थानिक महिला बचत गटांना हे काम देण्यात येणार असल्याचेही कळते. विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत शाळा व्यवस्थापन समितीमार्फत पुढील वर्षी स्थानिकस्तरावर कोणतीही खरेदी करू नये असे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे. राज्यातील जवळपास ४८ लाख विद्यार्थ्यांना या योजनेच्या माध्यमातून प्रत्येकी दोन गणवेश दिले जाणार आहेत. यासाठी प्रत्येक गणवेशासाठी सरकारने ३०० रुपयांचा खर्च अपेक्षित धरला आहे

# विषारी वेटोळ्यातील शहरे

सूनमधील कैद्याच्या पलायनाने कायदा-सुव्यवस्था यंत्रणेतलेच नव्हे तर अन्य व्यवस्थांमधले मोठे दोषही ढळढळीतपणाने समोर आले. एखाद्या लोकप्रिय महामालिकेतील थरारक घटनांप्रमाणे सध्या अंमली पदार्थांचा अदृश्य सर्प आपली वेटोळी उलगडू लागल्याचे चित्र अचानक दिसू लागले आहे. या बातम्या पाहून वा वाचून कुठल्याही सुजाण नागरिकाचा जीव थाऱ्यावर राहणार नाही, हे खरेच. अमली पदार्थाच्या निर्मितीतील आणि तस्करीच्या अधोविश्वाचा प्रमख सूत्रधार म्हणून ललित पाटील हे नाव सध्या चर्चेत आले आहे.ससून रुग्णालयातून पाटील फरार झाला. त्यामुळे आपल्या कायदा-सुव्यवस्थेतलेच नव्हे तर अन्य व्यवस्थांमधलेही मोठे दोष ढळढळीतपणाने समोर आले. ससून रुग्णालय प्रशासन, पोलिसांची संरक्षण व्यवस्था, येरवडा मध्यवर्ती कारागृहातील यंत्रणा, राज्याची प्रशासकीय यंत्रणा या सगळ्यांतील पोखरलेपण समोर आले. राजकारणाचे गुन्हेगारीकरण कोणत्या तरापर्यंत गेले आहे, याचाही प्रत्यय आला.सरकारी व्यवस्थेची अवस्था नेमकी काय झाली आहे, याचे सर्वांचे ताजे उदाहरण म्हणजे हे ललित पाटील प्रकरण. ससून रुग्णालय, कारागृह प्रशासन आणि पुणे शहर पोलिस यंत्रणा यांचे या प्रकरणामुळे अक्षरशः वाभाडे निघाले आहेत. कैदी फरार झाल्यानंतर काहीतरी कारवाई करणे भाग होते.त्यामुळे नऊ पोलिसांचे तातडीने निलबंन करण्यात आले. पण, ही झाली वरवरची मलमपट्टी. रोगाचे मूळ निदान आणि त्यावर प्रभावी उपचार करण्याकडे



सर्वच पातळीवर अनास्था असल्याचे स्पष्ट दिसते. त्यातच आता राजकारणदेखील तापू लागले आहे.पश्चिम महाराष्ट्रातील गरीब रुग्णांचे आशास्थान असलेल्या ससून रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावरच दोन कोटी रुपयांहून अधिक किमतीचे अमली पदार्थ सापडले. यानंतरच्या घटना अगदी 'ब्रेकिंग बॅड' किंवा 'नार्कोस' या आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेल्या वेबमालिकेत अथवा एखाद्या हिंदी चित्रपटात शोभाव्या तशा घडल्या.अमली पदार्थ तस्करीतील मुख्य सूत्रधार दुसऱ्याच दिवशी आरामात पळतो, पंचतारांकित हॉटेलातील त्याचा वावर दृश्य स्वरुपात पाहायला मिळतो, नंतर चेन्नई येथे त्याला परत पकडले जाते आणि न्यायालयात वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात घेऊन जात असताना पाटील माध्यमांच्या प्रतिनिधींकडे बघत म्हणतो की, 'मी पळालो नाही. मला पळवलं गेलंय.' हे सारेच विमनस्क करणारे आहे.यातले खरे काय नि खोटे काय, हे चौकशीअंती बाहेर येईल, अशी भाबडी अपेक्षा बाळगण्यापलीकडे कुणाच्याच हातात काही उरलेले नाही. ललित पाटीलने केलेले वक्तव्य एका संशयिताचे आहे. तो या साऱ्या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार होता, हे खरे मानायचे की यामागे कुण्या बड्या धेंडाचा हात आहे? रुग्णालयातूनही तो इतर साथीदारांच्या संपर्कात होता का? त्याला नेमका कोणता गंभीर आजार झाला होता?शस्त्रक्रियेसाठी अनुकूल अभिप्राय तज्ज्ञांकडून आल्यानंतरही त्याच्यावर शस्त्रक्रिया का केली नाही? अशा धारदार प्रश्नांवर ससून रुग्णालय प्रशासनाने मौन बाळगले आहे, आणि पोलिस यंत्रणेनेही. 'या प्रकरणाचा गोपनीय अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठविला आहे,' हे प्रशासनातील बुळबुळीत झालेले वाक्य माध्यमांच्या प्रतिनिधींच्या तोंडावर फेकून रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी मूग गिळून गप्प बसले आहेत.या संपूर्ण प्रकरणात ससून रुग्णालयातील अधिकारी, डॉक्टर यांची चौकशी करण्यासाठी चार सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. त्यात फक्त कागदी घोडे नाचविण्यात आले, असे दिसते. रुग्णालयातून कैदी पळाला इतकी मर्यादित ही घटना नाही. त्यामागे मोठे अर्थकारण असावे, असे प्रथमदर्शनी तरी दिसते. तसेच, त्याला राजकारणाचा एक कंगोराही आहे.ललित पाटील आणि त्याच्या साथीदारांचा अमली पदार्थनिर्मितीचा नाशिकमधला कारखाना पोलिसांनी उद्ध्वस्त केला असला तरीही त्याचा राजकीय धुरळा मात्र आता पसरत आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या झडणाऱ्या फैरी एका बाजूला आणि दुसरीकडे पाटील याने 'मी पळालो नाही...' असे सांगणे हा निश्चित योगायोग होऊ शकत नाही.रुग्णालय, पोलिस, आणि कारागृह या तिन्ही व्यवस्थांना ग्रासलेला 'कर्करोग' नेमका किती आणि कुठे-कुठे पसरला आहे, याचे निदान आता संपूर्ण व्यवस्थेचे 'स्कॅनिंग' केल्याशिवाय कळणार नाही. पण, अशी तपशीलवार तपासणी करण्याचा निर्णय, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेणार का, हा खरा कळीचा मुद्दा आहे.अंमली पदार्थांच्या विळख्यात महाराष्ट्रातली शहरे अशी अडकू लागली तर 'उद्याच्या' आधुनिक भारताचे स्वप्न पाहाणे निव्वळ मनाचे रंजन ठरेल. अंमली पदार्थांचा सुळसुळाट हा जागतिक चिंतेचा विषय आहे. प्रगत देशांनाही हे दुखणे आटोक्यात आणता आलेले नाही. अंमली पदार्थांची तस्करी एकवेळ कडक कायदे आणि तपासण्यांद्वारे नियंत्रणात ठेवता येऊ शकते. पण निर्मितीच स्थानिक पातळीवर व्हायला लागली, तर सारेच कठीण होईल.जे काही सकृतदर्शनी दिसते, त्यावरुन अंमली पदार्थांचा हा विळखा भयाकारीपणे घट्ट होत असल्याचा भास होतो. ही विषारी पिलावळ वेळीच रोखायची असेल, तर आधी सरकारी यंत्रणांनी आपल्या कर्तव्यांवर चढलेली बुरशी झटकण्याची खरी गरज आहे. अंमली पदार्थांचा हा विषारी सर्प आपल्या अंगणातच फळतो, फुलतो आहे, ही जाणीवच अंगावर शहारे आणणारी आहे.

## प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये होणाऱ्या कार्यक्रमाचे काटेकोर नियोजन करा

# प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याने समन्वय राखत जबाबदारी चोखपणे पार पाडावी– पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**अहमदनगर** –देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत शिर्डी येथे होणाऱ्या संभाव्य कार्यक्रमात विविध विकास कामांचे उदघाटन २६ ऑक्टोबर रोजी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यक्रमाचे काटेकोरपणे नियोजन करण्यात यावे. तसेच प्रत्येक विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी समन्वय राखत त्यांना नेमून देण्यात आलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, असे निर्देश राज्याचे महसूल, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात प्रधानमंत्री यांच्या संभाव्य दौऱ्याच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.त्याप्रसंगी पालकमंत्री श्री विखे पाटील बोलत होते. बैठकीस खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार प्रा. राम शिंदे, आमदार मोनिका राजळे, मध्यवर्ती जिल्हा बँकचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले, माजी आमदार वैभव पिचड, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ,




जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, साईसंस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.शिवाशंकर आदी उपस्थित होते.पालकमंत्री श्री विखे पाटील म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत शिर्डी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्याचबरोबरच या कार्यक्रमामध्ये विविध योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाचे वाटपही करण्यात येणार असल्याने लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी कार्यक्रम स्थळी आणण्याची व परत सोडण्याची वाहतूक व्यवस्था करावी. कार्यक्रम स्थळी भोजन व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, पिण्याचे पाणी आदि सर्व सुविधांचे सुक्ष्म नियोजन करुन कार्यक्रम यशस्वी करावा, असे त्यांनी यावेळी सांगितले.प्रधानमंत्र्यांच्या दौऱ्यादरम्यान कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवावी. प्रधानमंत्री थांबणार आहेत त्या विश्रामगृह तसेच कार्यक्रमस्थळी पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात यावा. सुरक्षा व्यवस्थेबाबत ब्लू बुक मधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. प्रधानमंत्री ज्या मार्गाने प्रवास करणार आहेत त्या ठिकाणी वाहतुकीचे नियमन करण्यात यावे. आवश्यकतेनुसार रस्त्यांची दुरुस्ती करून घेण्यात यावी. मान्यवर भेट देण्यात येणाऱ्या ठिकाणी स्वच्छता राहील यादृष्टीने कार्यवाही करावी. संपूर्ण दौऱ्यादरम्यान वीज पुरवठा सुरळीत ठेवावा. रस्त्यावरील सर्व विद्युत तारांची तपासणी करण्यात यावी. आरोग्य पथक सर्व सुविधांसह सज्ज ठेवण्याचे निर्देशही पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. खासदार डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, शासन आपल्या दारी हा कार्यक्रम इतर जिल्ह्यांच्या तुलनेते सर्वोत्कृष्ट असा कार्यक्रम शिर्डी येथे संपन्न झाला. त्याप्रमाणेच या कार्यक्रमाचेही सुक्ष्म नियोजन करण्यात येऊन हा कार्यक्रम यशस्वी करण्याच्या सुचना त्यांनी यावेळी दिल्या. विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे म्हणाले की, प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये होत असलेल्या कार्यक्रमामध्ये प्रत्येक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दक्षपणे काम करावे. या काळामध्ये कुठल्याही अधिकारी, कर्मचाऱ्याने विनापरवानगी मुख्यालय न सोडण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ म्हणाले की, प्रधानमंत्र्यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने प्रत्येक विभागाकडे जबाबदारी सोपविण्यात येणार असुन तसे आदेशही निर्गमित करण्यात येणार आहेत. आदेशाप्रमाणे प्रत्येक विभागाने त्यांची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.बैठकीस पदाधिकारी, सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.



# राज्याचा ऊस गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरु होणार

**मुंबई**–मुंबईत मंत्रिमंडळाची आज महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत यंदाचा ऊसाचा गळीत हंगाम १ नोव्हेंबर पासून सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावर्षी ८९ लाख मेट्रिक टन साखर उत्पादनाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.गेल्या वर्षी राज्यात २११ साखर कारखान्यांनी गाळप घेतले असून १०५ लाख मेट्रीक टन साखरेचे उत्पादन झाले आहे. यंदा मात्र उसाचे क्षेत्र घटल्याने साखर उत्पादन ८८.५८ लाख मेट्रीक टन एवढे होण्याचा अंदाज यावेळी वर्तविण्यात आला. हंगाम २०२२-२३ मध्ये साकार उत्पादनात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून त्यापाठोपाठ उत्तरप्रदेश राज्याचा क्रमांक आहे.ऊस तोड कामगारांसाठी त्यांच्या कुटुंबासाठी, मुला-मुलींच्या शिक्षणासाठी तसेच विविध योजनांचा लाभ देण्यासाठी साखर कारखान्यांकडून १० रुपये प्रति टन याप्रमाणे वसुली करून लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोड कामगार कल्याण महामंडळाला ही रक्कम देण्याचे यावेळी निर्णय झाला. या रकमेतून कामगारांच्या मुला-मुलींसाठी शाळा, वसतीगृह त्याचबरोबर कामगार हिताच्या योजना प्रभावीपणे राबवा, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी एफआरपी बाबात समग्र माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.राज्यात साखर हंगाम सुरु करण्याबाबत वेगवेगळे मतप्रवाह होते. ऊसाचे घटलेले उत्पादन आणि चाऱ्यासाठी होत असलेला वापर बघता गाळप हंगाम १५ ऑक्टोबरला सुरु करण्याची आवश्यकता काही जणांनी केली होती. तर दुसरीकडे लवकरच हंगाम सुरु केल्यास ऊसाला योग्य उतारा मिळणार नाही आणि त्यातून शेतकरी आणि कारखान्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता असल्यानं हंगाम १५ नोव्हेंबरपासून सुरु करावा, अशी मागणी देखील करण्यात आली होती. पण अखेर आज अंतिम निर्णय झाला असून १ नोव्हेंबर पासून ऊसाचे गाळप सुरु होणार आहे.यावर्षी राज्यात पावसाचे प्रमाण कमी राहिले आहे. राज्यातील बहुतांश जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. याचा परिणाम ऊसाच्या उत्पादनावर होणार आहे. त्यामुळं मागील हंगामाच्या तुलनेत साखर उत्पादनात घट होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. पावसाअभावी ऊसाचे घटलेले क्षेत्र, विविध साखर कारखान्यांनी वाढवलेली क्षमता यामुळं यावर्षी ऊस गाळप हंगाम कसाबसा केवळ तीन महिने चालण्याची शक्यता आहे. देशातील साखर उत्पादनापैकी सुमारे एक तृतीयांश साखर उत्पादन महाराष्ट्रात होते. नोव्हेंबर ते जानेवारी हे तीन महिने ऊसाचा गळीत हंगाम चालणार आहे. यंदा उत्पादनात मोठी टक्के घट होण्याची शक्यता आहे. याशिवाय राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये गुऱ्हाळघरे आणि खांडसरी सुरू झाल्या आहेत. अनेक शेतकरी आपला ऊस गुऱ्हाळघरे आणि खांडसरीला पाठवत आहेत. जर राज्यातील गाळप हंगाम उशिरा सुरु झाला तर काही शेतकरी तोपर्यंत गाळपासाठी अन्य पर्याय स्वीकारु शकतात. त्याचा फटका साखर कारखान्यांना बसू शकतो.

# सरकार मराठा आरक्षणावर प्रामाणिक नाही,आरक्षण अशा पद्धतीने मिळणार नाही–प्रकाश आंबेडकर

**मुंबई**–मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सरकार प्रामाणिक नसल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. मराठा आरक्षणाबाबत सरकार प्रामाणिक नाही. ते सर्वसामान्यांशी खेळ करत आहे. मनोज जरांगे पाटील काय निर्णय घेणार याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. पण सत्ता उपभोगणाऱ्या सत्ताधिशांना त्याची चिंता लागली आहे, असे ते म्हणाले.मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालन्याच्या सुनील कावळे यांनी मुंबईत आत्महत्या केली. त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. प्रकाश आंबेडकर याविषयी बोलताना म्हणाले की, आरक्षण अशा पद्धतीने मिळणार नाही. सुप्रीम कोर्ट काय म्हणत हे महत्वाचे आहे. कोर्ट डेटा आणा असे म्हणत आहे. डेटा नाही म्हणून नाही असे कोर्ट म्हणत आहे. एक विंडो ओपन आहे. मात्र, त्या पद्धतीने जाणे गरजेचे आहे. मराठा समाजातील भांडण हे ऐतिहासिक आहे. एकमेकांच्यात भांडण आहेत, असे मत त्यांनी व्यक्त



केले.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, शिवसेना आणि आमचे जागा वाटप झाले आहे, असे मी मानतो. बाकी त्रिकूटाबाबत त्यांनी निर्णय घ्यावा, लोकसभा आणि विधानसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपल्यश आहेत. अशात शिवसेना आणि वंचितची आघाडी झाली असून आहे. यावर प्रकाश आंबेडकर यांनी भाष्य केले आहे.सरकारने बळी घ्यायचे का ठरवले आहे हे कळत नाही. सरकारमुळे बळी पडायला लागले आहेत. भावांनो आरक्षण मिळणार आहे. आरक्षण घेतल्याशिवाय सोडणार नाही. खूप वर्ष दम धरला आहे. थोडे दिवस आणखी दम धरा. तुमच्या पायाला हात लावून सांगतो पोरं जायला लागले, आत्महत्या करायला लागले तर आरक्षण घेऊन उपयोग काय? तुम्ही दम धरा. पण हे सगळे पाप सरकारचे आहे. सरकारला किती मुडदे पाडायचे आहेत माहीत नाही. एक माणूस कमी झाला. याला पूर्ण जबाबदार सरकार आहे. आता तरी त्याचे बलिदान वाया जाऊ देऊ नये. सरकारने आता तातडीने मराठा आरक्षणाचा निर्णय घ्यावा. २४ तारखेनंतर होणारे आंदोलन सरकारला परवडणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटलांनी दिला.

# मतांच्या राजकारणासाठी शरद पवार दहशतवाद्यांचे समर्थन करतात–बावनकुळे

**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यावर थेट टीका करताना, शरद पवार यांच्याकडून दहशतवाद्यांचे समर्थन करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात बावनकुळे यांनी केला आहे. इस्रायल-हमास-पॅलेस्टाईन यांच्यातील युद्धावर भाष्य करताना, मतांच्या राजकारणासाठी शरद पवार दहशतवाद्यांचे समर्थन करतात, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.दरम्यान चंद्रशेखर बानकुळे पुढे बोलताना म्हणाले की, मतांच्या राजकारणासाठी ते दहशतवाद्यांचे समर्थन करत असल्याचे म्हटले आहे. मतासाठी दहशतवाद्यांना किती मदत आणि समर्थन करायचे हे शरद पवारांच्या वक्तव्यावरुन कळते मी त्यांचा निषेध करतो असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शरद पवार यांनीही दहशतवादी हल्ल्याचा निषेध करायला हवे. कारण, दहशतवादी हल्ल्याच्या यातना मुंबईने अधिक सोसल्या आहेत. विशेषत: २६/११ च्या वेळी मुंबईने अनेक नागरिक गमावले. त्यामुळे केवळ मतांच्या राजकारणाचा विचार करु नका, तर दहशतवादाचा तीव्र शब्दात धिक्कार करा अशी शरद पवार यांना विनंती आहे असा खोचक सल्ला त्यांनी दिला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे इस्रायलच्या पाठीशी उभे राहिले आहेत, यावर शरद पवार यांनी टीका केली आहे. मात्र त्यांनी हे लक्षात घ्यायला हवे, की सध्या जगात सुरू असणारी लढाई ही दहशतवाद आणि दहशतवादविरोधी राष्ट्रे यांच्यादरम्यान सुरू आहे. अशावेळी दहशतवादी देशाविरोधात उभे राहून इस्रायलला पाठिंबा देणे क्रमप्राप्तच आहे. मुंबईत झालेले बॉम्बस्फोट, २६/११चा दहशतवादी हल्ला यांसारख्या घटना, त्यामध्ये किती लोक बळी गेले, हे सर्व शरद पवार यांनी आठवावे. असे असतानाही शरद पवार दहशतवादी देशांच्या पाठीशी का उभे राहत आहेत? हे सर्व मतांच्या राजकारणासाठी सुरू आहे की त्यामागे आणखी काही कारण आहे, हे जनता जाणतेच! असे म्हणत विनोद तावडेंनी शरद पवारांवर टीका केली आहे.

# गडचिरोली जिल्हा काँग्रेसचे मुख्य वनसंरक्षक कार्यालयाला घेराव आंदोलन

## जंगली हत्तीसह नरभक्षक वाघाचा ताडीने बंदोबस्त करण्याची केली मागणी

**गडचिरोली** –जिल्ह्यातील अनेक भागात मागील एक वर्षांपासून जंगली हत्तीचे आगमन झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दिवसेंदिवस जंगली हत्ती आणि वाघाच्या हल्यात अनेक नागरिकांना जिवही गमावावा लागत आहे. आता काही ठिकाणी पीक नीसवन्यावर तर काही ठिकाणी कापण्यावर येत आहे. अश्यात या हत्तीचा आणि नरभक्षक वाघाचा हौदास वाढल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. हत्ती आणि वाघाचा तातडीने बंदोबस्त करण्यात यावा, आतापर्यंत हत्ती, वाघासह जंगली प्राण्याने ज्या शेतकऱ्याचे नुकसान केले त्यांना तातडीने आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी, जंगली प्राण्याच्या हल्यात मयत झालेल्या मृताच्या परिवारास आर्थिक मदत करण्यात यावी, नुकसान भरपाई देत असताना जाचक असलेल्या अटींमध्ये शिथिलथा देण्यात यावी, गडचिरोली वनवृत्तात वन्यजीव विभागाची निर्मिती करण्यात यावी या मागण्यांना घेऊन गडचिरोली जिल्हा काँग्रेस
कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांच्या नेतृत्वात मुख्य वनसरक्षक कार्यालयाला घेराव करून आंदोलन करण्यात आले व मुख्य



वनसंरक्षकांना भेटून १५ दिवसाच्या अल्टीमेटम सह निवेदन देण्यात आले. १५ दिवसाच्या आत मागण्या पूर्ण न झाल्यास वनमंत्र्यांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी सांगितले.यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी महासचिव डॉ.नामदेव किरसान, माजी आमदार आनंदराव गेडाम, प्रदेश सचिव डॉ. नितीन कोडवते, माजी जि.प. उपाध्यक्ष मनोहर पोरेटी, युवक काँग्रेस प्रदेश सचिव विश्वजीत कोवासे, महिला जिल्हाध्यक्ष ऍड. कविता मोहरकर, गडचिरोली तालुकाध्यक्ष वसंत राऊत, आरमोरी तालुकाध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, चामोर्शी तालुकाध्यक्ष प्रमोद भगत, पर्यावरण सेल अध्यक्ष राजेश ठाकूर, अनुसूचित जाती सेल अध्यक्ष रजनीकांत मोटघरे, युवक काँग्रेस अध्यक्ष लोरन्स गेडाम, किसान सेल अध्यक्ष वामनराव सावसाकडे, ओबीसी सेल अध्यक्ष भूपेश कोलते, परिवहन सेल अध्यक्ष रुपेश टिकले, ओबीसी सेल कार्याध्यक्ष दिवाकर निसार, शिक्षक सेल अध्यक्ष दत्तात्रय खरवडे, जिल्हाउपाध्यक्ष नेताजी गावतुरे, प्रभाकर वासेकर, माजी जि.प. सदस्य कविता भगत, प्रभाकर कुबडे, तेजस मडावी, पुष्पलता कुमरे, मंगला कोवे, सुरेश भांडेकर, देवेंद्र ब्राह्मणवाडे, राजाराम ठाकरे, जितेंद्र मुनघाटे, योगेंद्र झंजाळ, निकेश कामीडवार,प्रफुल आंबोरकर, रमेश धकाते, नृपेश नांदनकर, कमलेश खोब्रागडे, ढिवरू मेश्राम, जावेद खान, पुरुषोत्तम सिडाम सह मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकारी आणि शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले.

### शंभूराज देसाई सातारकरांना दिलेल्या शब्दावर राहिले पक्के

# महाराष्ट्र शासनाच्या सहभागाने सातारा येथे शाही दसऱ्याचे आयोजन

**सातारा । प्रतिनिधी**

यंदाचा सातारचा शाही दसरा उत्सव पारंपारिक लवाजम्यासह मोठ्या दिमाखात साजरा होणार आहे. या शाही दसरा उत्सवात शासनाचाही सहभाग असणार आहे. हा उत्सव मोठ्या दिमाखात साजरा होण्यासाठी सर्व विभागांनी आपआपले योगदान द्यावे, अशा सूचना पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केल्या. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या तर्फे साजरा होणाऱ्या पारंपारिक शाही दसरा सोहळ्यामध्ये यावर्षीपासून शासनाचा सहभाग असणार आहे.जिल्हाधिकारी कार्यालयात दसरा उत्सव साजरा करण्याच्या अनुषंगाने पालकमंत्री देसाई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला आमदार श्री छ शिवेंद्रसिंहराजे भोसले , पोलीस अधीक्षक समिर शेख, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादवे घुले, प्रांताधिकारी सुधाकर भोसले, नगर प्रशासन अधिकारी अभिजीत बापट, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव, सुनिल काटकर , जितेंद्र खानविलकर, काका धुमाळ , विनित पाटील, आदी उपस्थित होते.शाही दसरा मोठ्या उत्साहात साजरा होण्यासाठी प्रांताधिकारी सातारा यांना सन्मवयक म्हणून नियुक्ती करावी, अशा सूचना करुन पालकमंत्री देसाई म्हणाले, जलमंदिर येथे पालखीमध्ये भवानी तलवार पुजनावेळी पोलीस बॅन्ड पथकाने मानवंदना द्यावी. मिरवणुकीमध्ये घोडे, उंट यांचाही वापर करावा. यावर बसणाऱ्यांना मावळ्यांचा पोशाख द्यावा. पालखी सोबत समारंभाच्या पोषाखातील पोलीस



पथक ठेवावे. शासनातर्फे जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना निमंत्रित करावे.दसरा शाही मिरवणुकीला सायंकाळी ५.३० वाजता सुरुवात होईल. ही मिरवणूक जलमंदिर ते शिवतिर्थ अशी होईल. त्याचबरोबर शाही पोवाड्याचे आयोजन करावे. राजपथ मार्ग नगर परिषदेने स्वच्छ करावा. तसेच शासकीय कार्यालय व सार्वजनिक ठिकाणी विद्युत रोषणाई करावी. मिरवणूकीच्या प्रारंभी पोलीस पायलेटींग ठेवावे. या वर्षीचा शाही दसरा सर्वांच्या सहभागाने उत्साहात साजरा करावाचा आहे त्या दृष्टी जबाबदारी दिलेल्या विभागांनी योग्य ते नियोजन करावे, अशा सूचनाही पालकमंत्री देसाई यांनी केल्या.

# पंतप्रधानांच्या हस्ते चंद्रपूर जिल्ह्यातील १५ ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन

## मोरवा येथील युनिको कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रात जिल्हास्तरीय आयोजन

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

आजच्या तरुण – तरुणींना शिक्षणासोबतच कौशल्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराभिमुख करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील १५ केंद्राचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. जिल्हास्तरीय मुख्य कार्यक्रम मोरवा येथील त्रिनेत्र पद्म कृषी व ग्रामीण शिक्षण संस्था अंतर्गत युनिको कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र येथे पार पडला.कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त भैयाजी येरमे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य रवि मेहंदळे, नामदेव डाहूले, अनिल डोंगरे, युनिको कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राचे राजू विश्वास, गटनिदेशक बंडोपंत बोडेकर, श्रीराम मगर यांच्यासह शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राज्यातील ५११ तर चंद्रपूर जिल्ह्यातील १५ गावांमध्ये प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन करण्यात आले आहे. या ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून युवक आणि युवतींचे रोजगाराभिमुख कौशल्य वाढण्यास नक्कीच मदत होईल. यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने विशेष कार्यक्रम राबविण्यात येईल. या केंद्राचा ग्रामीण भागातील तरुण विद्यार्थ्यांनी उपयोग करून घ्यावा, जेणेकरून आपल्या गावाची, जिल्ह्याची, राज्याची आणि पर्यायाने देशाची प्रगती होईल. तसेच आपल्या अर्थव्यवस्थेला हातभार लागेल.तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलतांना पंतप्रधान म्हणाले, जगात भारतातील कार्यक्षम आणि प्रशिक्षित युवकांची मागणी वाढली आहे. बांधकाम, आरोग्य, पर्यटन, शिक्षण, वाहतूक व संदर्भीय सेवा या क्षेत्रात विशेष



मागणी आहे. प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुण तरूणी रोजगाराभिमुख प्रशिक्षित होतील. महाराष्ट्रात बांधकाम आणि मनोरंजनाच्या क्षेत्रात मोठे काम असल्यामुळे भविष्यातही अनेक केंद्र स्थापन होणार आहेत. महाराष्ट्र सरकारने लघु प्रशिक्षणाकडेसुध्दा लक्ष केंद्रीत करावे. त्यासाठी प्रशिक्षणाचे ऑनलाईन सत्र आयोजित करावे. प्रशिक्षित लोकांना उद्योगांचे प्रथम प्राधान्य असते. भारतात केंद्र सरकारने कौशल्य विकास मंत्रालयाची स्थापना करून वेगळे बजेट त्यासाठी दिले आहे. कौशल्य विकासाचा सर्वाधिक लाभ गरीब कुटुंबांना होतो. केंद्र सरकारने पी.एम. विश्वकर्मा योजना सुरू केली असून यासाठी १३ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. राज्यातील ५११ ग्रामीण कौशल्य विकास केंद्रातून ही योजना पुढे जाणार असल्याचेही पंतप्रधान म्हणाले.

**उद्घाटन झालेली जिल्ह्यातील ग्रामीण विकास कौशल्य केंद्र**

कोठारी (ता. बल्लारपूर), चंदनखेडा (ता. भद्रावती), गांगलवाडी (ता.ब्रह्मपुरी), मोरवा (ता.चंद्रपूर), नेरी (ता.चिमूर), भंगाराम तळोधी (ता.गोंडपिपरी), शेनंगाव (ता.जिवती), नांदाफाटा (ता.कोरपना), राजोली (ता.मुल), तळोधी बाळापूर (ता.नागभीड), देवाडा खु., (ता.पोंभुर्णा) विरुर (ता.राजुरा), मोखाळा (ता.सावली), नवरगाव (ता.सिंदेवाही) आणि शेंगाव (ता.वरोरा)

# पंतप्रधानांच्या हस्ते जिल्ह्यातील १२ ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन

**गडचिरोली | प्रतिनिधी**

आजच्या तरुण – तरुणींना शिक्षणासोबतच कौशल्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराभिमुख करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. या अंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील १२ केंद्राचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. यात विसोरा, असरअली, गेदा, मुरुमगाव, पोर्ला, आष्टी, कढोली, वैरागड, सुंदरनगर, कोटगुल, आरेवाडा आणि आलापल्ली येथील ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचा समावेश आहे.



वैरागड येथे पार पडलेल्या कार्यक्रमाला खासदार अशोक नेते उपस्थित होते. तर पोर्ला येथील कार्यक्रमाला जिल्हाधिकारी संजय मिना, मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. तसेच वैरागड येथे जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे सहाय्यक आयुक्त योगेंद्र शेंडे, आरमोरीचे तहसीलदार माने यांच्यासह वैरागडचे सरपंच, उपसरपंच आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. मार्गदर्शन करतांना पंतप्रधान म्हणाले, जगात भारतातील कार्यक्षम आणि प्रशिक्षित युवकांची मागणी वाढली आहे. बांधकाम, आरोग्य, पर्यटन, शिक्षण, वाहतूक व संदर्भीय सेवा या क्षेत्रात विशेष मागणी आहे. प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुण तरूणी रोजगाराभिमुख प्रशिक्षित होतील. महाराष्ट्रात बांधकाम आणि मनोरंजनाच्या क्षेत्रात मोठे काम असल्यामुळे भविष्यातही अनेक केंद्र स्थापन होणार आहेत. महाराष्ट्र सरकारने लघु प्रशिक्षणाकडेसुध्दा लक्ष केंद्रीत करावे. त्यासाठी प्रशिक्षणाचे ऑनलाईन सत्र आयोजित करावे. प्रशिक्षित लोकांना उद्योगांचे प्रथम प्राधान्य असते. भारतात केंद्र सरकारने कौशल्य विकास मंत्रालयाची स्थापना करून वेगळे बजेट त्यासाठी दिले आहे. कौशल्य विकासाचा सर्वाधिक लाभ गरीब कुटुंबांना होतो. केंद्र सरकारने पी.एम. विश्वकर्मा योजना सुरू केली असून यासाठी १३ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. राज्यातील ५११ ग्रामीण कौशल्य विकास केंद्रातून ही योजना पुढे जाणार असल्याचेही पंतप्रधान म्हणाले.

# प्रमोद महाजन ग्रामीण विकास केंद्रामार्फत ग्रामीण भागातील तरूण तरूणींना रोजगाराच्या नवी संधी

**वरोरा | प्रतिनिधी**

भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेतीतून पुरेसं उत्पन्न मिळत नाही .तसेच ग्रामीण भागातील जनतेला हाताला काम मिळावे असे उद्योग नाही.त्यामुळे ग्रामीण भागातील तरुण-तरुणींचे स्थलांतर शहरांकडे होत असते. कुटुंबाचा उदरनिर्वाह तसेच त्यांच्या गरजा पूर्ण होण्याकरता ते शहरांकडे स्थलांतर करीत असतात.त्यामुळे ग्रामीण भागातील तरुण-तरुणींचे स्थलांतर रोखून त्यांना गावातच उद्योग तथा रोजगाराची संधी मिळावी या हेतूने प्रमोद महाजन ग्रामीण विकास केंद्र सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असुन दिनांक १९ ऑक्टोबर २०२३ ला महाराष्ट्रात अशी ५११ केंद्र उभारली गेली आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील १५ तालुक्यात १५ केंद्र सूरू करण्यात आलेली आहेत. वरोरा व भद्रावती तालुक्यातील लोकार्पण कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र नेहरू विद्यालय, शेगाव, ता. वरोरा व ग्राम पंचायत भवन, चंदनखेडा, भद्रावती येथे दिनांक १९ आक्टोबर रोज गूरूवारला दुपारी ४.३०वा. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, यांचे हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे उद्घाटन करण्यात आले आहे.या केंद्रांतर्गत दहावी पास असलेल्या तरुणांना गावातच रोजगार मिळणार आहे. या केंद्राचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हस्ते होणार आहे. दहावी, बारावी ते पदवी



पर्यंतचे शिक्षण झालेल्या तरूण तरूणींना मल्टीस्किल टेक्नीशियन, ग्राफिक डिझायनर, पर्यटन मार्गदर्शन, मोबाईल फोन हार्डवेअर रिपीयर टेक्निशियन, जामजेली अण्ड कैच अप प्रोसेसिंग, टेक्निशियन,एल ईडी रिपीअर टेक्निशियन, फिल्ड टेक्निशियन, फ्रंट ऑफिस असोसिएट, वेअर हाऊस सुपरवायसर यासह अनेक कोर्स दिनांक ०१ नोव्हेंबर २०२३ पासून सदर केंद्रावर मोफत शिकविले जाणार आहेत. सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत या केंद्रावर प्रशिक्षण मिळणार आहे.एका केंद्रावर ५० तरूणांच्या दोन बैचेस असतील. तीन वर्षांपर्यंत हा उपक्रम सुरू राहणार आहे. अशा बहूमुल्य केंद्राचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते करण्यात आले असुन या प्रसंगी विधानसभा प्रमुख इंजी. रमेश राजुरकर, खंड विकास अधिकारी वरोरा संदिप गोडशेलवार, तहसीलदार वरोरा कोटकर, तहसीलदार भद्रावतीसोनवाने, खंड विकास अधिकारी भद्रावती.सपकाल यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये शेगाव, ता वरोरा व चंदनखेड़ा, ता. भद्रावती येथे कार्यक्रम पार पडला असुन सदर कार्यक्रमात प्राचार्य अतुल गुंडावार व भाजपा चे पदाधिकारी राजु बचूवार, संजय रॉय, अमन सिंग आणि बहू सखेनी युवा वार्गातील तरुण, तरूणी उपस्थित राहुन कार्यक्रमाचा लाभ घेतला. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२३ पासून परम स्किल ट्रैनिंग खइंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचे मार्फेतीने सदर केंद्रावर पासून निशुल्क प्रशिक्षण वर्ग सुरू होत असुन सुशीक्षित बेरोजगार तरुण वर्गानि यांचा लाभ घेवून स्वरोजगार निर्माण करावा असे आवाहन विधानसभा प्रमुख रमेश राजुरकर यांचे मार्फत करण्यात आले.

# माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचा हस्ते आलापल्ली येथे भागवत कथेचा शुभारंभ

**आलापल्ली | प्रतिनिधी**

येथिल साईबाबा देवस्थान, समिती द्वारा आयोजित बालयोगी गोपालजी महाराज, कारखेड जि. वाशीम यांचा भागवत कथेचे माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचा शुभहस्ते काल संध्याकाळी दीपप्रज्वलन करून शुभारंभ झाले, ह्या भागवत कथेला भाविकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला, पहिल्याच दिवशी भव्य पेंडाल तुडुंब भरले होते, ही भागवत कथा ७ दिवस चालणार आहे.भागवत कथा ऐकणे हे पुण्याचे कार्य असून ह्या माध्यमातून चांगले संस्कार भावी पिढीला होणार असल्याने जुन्या पिढीसह युवकांनी ही मोबाईलचा मोहातून बाहेर येऊन भागवत कथेचा अवश्य लाभ घ्यावा व समाजात सकारात्मक बदल घडवावा असे प्रतिपादन राजेंनी ह्यावेळी केले तसेच तब्बल अडीच तास



भविकांसोबत खाली जमीनीवर बसून पहिल्या दिवसाची भागवत कथा ऐकली.ह्यावेळी साईबाबा देवस्थान समिती, आलापल्ली तर्फे माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले, ह्यावेळी राजमाता राणी रुक्मिणीदेवी, कुमार अवधेशराव बाबा, प्रवीणराव बाबा सह श्री. साईबाबा देवस्थान समितीचे सर्व सदस्य तसेच भविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जिल्हा महिला व बालविकास विभागातर्फे बालविवाह तसेच गुड टच आणि बॅड टच जनजागृती अभियान

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये बालविवाह तसेच गुड टच आणि बॅड टच जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. याद्वारे १०९८ या टोल-फ्री क्रमांकाची देखील जनजागृती करण्यात येत आहे. न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, पांढरकवडा येथे जिल्हा चाईल्ड हेल्पलाईन तथा जिल्हा बाल संरक्षण कक्षाद्वारे बालविवाह आणि १०९८ चाईल्ड जनजागृती कार्यक्रम तर नवयुवक माध्यमिक विद्यालय, बाबुपेठ येथे गुड टच आणि बॅड टच या जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शुक्ला, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. रामटेके, चाइल्ड हेल्पलाईनचे समन्वयक अभिषेक मोहूर्ले, समुपदेशिका दिपाली मसराम, सामाजिक कार्यकर्ता प्रतिभा मडावी आदींची उपस्थिती होती.यावेळी महाविद्यालयातील उपस्थित बालकांशी संवाद साधून बालविवाह तसेच गुड टच आणि बॅड टच या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. त्यासोबतच, १०९८ या टोल-फ्री क्रमांकाची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना देण्यात आली.

# खोटी आश्वासनं देणाऱ्या व जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारला सत्तेतून भेदखल करा-डॉ.किरसान

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

१८ ऑक्टोंबर २०२३ रोजी ब्रह्मपुरी तालुक्यातील नवेगांव (कोथुळना) येथे नवदुर्गा उत्सवानिमित्त गरबा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी महासचिव तथा गडचिरोली-चिमूर लोकसभा समन्वयक डॉ. नामदेव किरसान यांच्या हस्ते पार पडले. यावेळी त्यांनी मोदी सरकारच्या खाजगीकरणाच्या धोरणाविरुद्ध बोलतांना सांगितले की, जे सार्वजनिक उपक्रम काँग्रेसच्या सरकारने व इतर पक्षाच्या सरकारांनी स्थापन केले होते त्यांची विक्री करण्याचं काम मोदी सरकार करीत आहे. अशा रीतीने सर्व क्षेत्रात खाजगीकरण करून सरकारी मालमत्तेची विक्री झपाट्याने करीत आहे. सरकारी नोकऱ्या संपविण्यात येत असल्यामुळे बेरोजगारीत वाढ झालेली आहे. अलीकडेच महाराष्ट्रातील भाजप प्रणित सरकारने सरकारी नोकर भरती कंत्राटी पद्धतीने करण्याचे ठरविलेले आहे व त्यासाठी कंत्राटदारांची नियुक्ती सुद्धा केलेली आहे. शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व शासकीय शाळांचे खाजगीकरण करण्याचे सुद्धा नियोजन केलेले आहे. खाजगी शाळेत फी भरावी लागेल व फी भरण्याची आर्थिक स्थिती शेतकरी व शेतमजुरांची नाही. गोरगरीब जनतेच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याच्या हा शासनाचा डाव आहे. याची जाणीव ठेवून सावध राहण्याची गरज आहे.

या व्यतिरिक्त अनेक स्थानिक समस्या आहेत. मोठ्या प्रमाणावर वाढलेली बेरोजगारी, जिल्ह्यात रोजगाराच्या संधींची कमतरता, शेतकऱ्यांच्या पंपासाठी वीज पुरवठ्याची समस्या, शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नसल्याची समस्या, पावसाळ्यात धरणाचे पाणी सोडल्यामुळे शेतीत पाणी साचून पिकं नष्ट होण्याच्या समस्या, धरणात पाणी अडवल्यामुळे शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या व काही गावांच्या पुनर्वसनाच्या समस्या, वाघांनी घातलेल्या धुमाकूळाच्या समस्या, रानटी हत्तींच्या कळपा ने घातलेल्या धुमाकूळळामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, जिल्ह्यातील



खराब रोड रस्त्यांच्या समस्या, विद्यार्थ्यांच्या समस्या अशा अनेक समस्या आहेत. गतवर्षी या समस्या घेऊन गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गडचिरोली ते नागपूर १७५ किलोमीटर पदयात्रा करून विधानभवनावर हजारोच्या संख्येने मोर्चा नेऊन विधान भवनात महाराष्ट्र शासनाचे उपमुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे समस्या ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यांनी स्वतः येऊन भेटतो व समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतो असे आश्वासन देऊन सुद्धा त्यांनी ते पूर्ण केले नाही. जवळपास एक वर्षाच्या कालावधी लोटलेला असला तरी त्या समस्या जशाच्या तशाच आहेत. चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यात वाघांचा धुमाकूळ आहे. वाघांच्या हल्ल्यात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. वाघांचा बंदोबस्त व्हावा यासाठी वनमंत्री व चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे चंद्रपूरला मोर्चा नेऊन घंटानाद आंदोलन करून सुद्धा वाघांच्या बंदोबस्त करण्यात आला नाही. अजूनही वाघांचा धुमाकूळ सुरूच आहे. सुधीर मुनगंटीवार हे वाघांचा बंदोबस्त करण्याऐवजी वाघनखे आणायला इंग्लंडला गेले होते. रिकाम्या हाताने परत आले असले तरी त्यांनी प्रथम वाघांच्या बंदोबस्ताकडे लक्ष द्यावे. जर सरकार दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करीत नसेल व जनतेच्या समस्या ऐकून घ्यायला तयार नसेल तर भविष्यात विचारपूर्वक निर्णय घेऊन अशा सरकारला सत्तेतून बेदखल करा असे आवाहन त्यांनी केले.यावेळी माजी सरपंच राजेश पारधी, योगिता आमले, जगदीश आमले, प्रेमलाल धोटे, सरपंच विकास नागतोडे, काशिनाथ नागतोडे, मंगेश शेंडे, पोलीस पाटील सुनील तलमले, पत्रकार अमर घाडगे, तंटामुक्ती अध्यक्ष माधव पारधी, माधुरी पारधी, सुरेखा नाकतोडे, रामकृष्ण तलमले, राजू धोटे, उत्तम नखाते, ग्राम काँग्रेस अध्यक्ष मिलिंद राऊत, ग्राम काँग्रेस अध्यक्ष झिलबोडी रवी शेंडे व मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .